**कृपया प्रसिद्धीसाठी** **18 एप्रिल 2009**

# माजी नगरसेवक श्री महेश भट यांचा पुन्हा भाजपात प्रवेश

**मुंबई, शनिवार**ः "मी पुन्हा स्वगृही परतल्यामुळे मनाला एक वेगळेच समाधान लाभत आहे. माझ्या सर्व शक्तिनिशी श्री राम नाईक यांना जास्तीत जास्त मताधिक्य मिळावे यासाठी मी प्रयत्न करेन." असे उद्‌गार माजी नगरसेवक आणि कांदीवली मधील समाजसेवक श्री महेश भट यांनी काढले. शेकडों कार्यकर्त्यांनी आणि अनेक महत्वाच्या कॉंग्रेस पदाधिका-यांनी श्री महेश भट समवेत भाजपात प्रवेश केला त्यावेळी श्री भट बोलत होते. श्री भट यांच्यासह युवक कॉंग्रेस मुंबईचे सचिव श्री चंद्रकांत भुवड तसेच सर्वश्री दयाळजी राठोड, आदिनाश शिंदे, चंद्रकांत नाईक, विनोद सागर, विलास दवे, हेमंत सोळंकी, गौरीशंकर जोशी, चेतन महेता, हिमांशू जोशी, मनोज वालिया, जावेद शेख, विनोद चोटालिया, अशोक वसमुल्ला, दिनेश भाई, श्रीमती नीलाबेन वालिया आदि अनेक महत्वाच्या स्थानिक नेत्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला.

यावेळी यासर्वांचे स्वागत करताना श्री राम नाईक म्हणाले, "भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक म्हणून श्री महेश भट यांनी चांगली कामगिरी केली होती ती सर्वांना माहितच आहे. त्यामुळे आपल्या सहका-यांसह भारतीय जनता पार्टीमध्ये त्यांचे स्वागत करताना मला अतिशय आनंद होत आहे," श्री महेश भट आणि श्री चंद्रकांत भुवड तसेच अन्य सर्वांनी श्री राम नाईक यांना विक्रमी मतांनी निवडून देण्यामध्ये हातभार लावावा, असे आवाहन यावेळी भाजपा मुंबईचे अध्यक्ष श्री गोपाळ शेटटी यांनी केले. भाजपा उत्तर मुंबईचे अध्यक्ष व नगरसेवक श्री योगेश सागर तसेच सर्वश्री भाई गिरकर, अतुल भातखळकर, रमेश मेढेकर आदि नेत्यांसह शेकडों कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

**(विनोद शेलार)**
**प्रसिद्धी प्रमुख**
**भ्रमणध्वनी 9867689540**